Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 3008
दिनांक : ३०/०९/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेकरिता योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याच्या तारखांमध्ये मुदतवाढ करण्यात आलेबाबत..

**संदर्भ:-** १) राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/३३३७ दि.२३/०८/२०२४
२) या कार्यालयाचे क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/१७५४ दि.२६/०८/२०२४
३) राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/३७६३ दि.२६/०९/२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ नुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) फेब्रु-मार्च २०२५ च्या परीक्षेपासून योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ऑनलाईन पध्दतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याची कार्यप्रणाली नव्याने सुरु करण्यात आल्यामुळे या शैक्षणिक वर्षात योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारण्याच्या तारखेत १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी, योग्यता प्रमाणपत्र अर्जाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) योग्यता प्रमाणपत्र अर्ज नियमित शुल्क भरुन दि.१५/१०/२०२४ पर्यंत स्विकारण्यात येतील. ही मुदतवाढ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठीच असेल. दि.१६/१०/२०२४ ते ३०/११/२०२४ पर्यंत योग्यता प्रमाणपत्र अर्ज विलंब शुल्काने स्विकारण्यात येतील.

२) या शैक्षणिक वर्षात योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन आणि ऑनलाईन या दोन्ही पध्दतीने स्विकारण्यात येतील. मात्र पुढील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या परीक्षेपासून योग्यता प्रमाणपत्रांचे अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.

३) ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आले असतील त्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने भरु नयेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन पध्दतीने भरण्यात आले असतील त्यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरु नयेत.

४) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन पध्दतीने विभागीय मंडळाकडे भरलेले असतील त्या महाविद्यालयाकडून योग्यता प्रमाणपत्र अर्जाचे शुल्क (भारतीय विद्यार्थ्यांसाठी रु.२००/- व भारताबाहेरील/ परदेशातील विद्यार्थ्यांसाठी रु.७००/-) वजा करुन ऑनलाईन पध्दतीमध्ये निश्चित केलेल्या उर्वरित शुल्काची रक्कम ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील.

५) ज्या महाविद्यालयांनी एकाच विद्यार्थ्याचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन व ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने भरलेले असतील तर यापैकी एका प्रणालीचे मंडळाकडे प्राप्त झालेले शुल्क परत करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे व रक्कम भरणा केलेल्या पावतीसह मंडळ कार्यालयास लेखी प्रस्ताव सादर करावा.

६) मुदतीनंतर योग्यता प्रमाणपत्र अर्ज निश्चित केलेले अतिविलंब शुल्क आकारुन ऑफलाईन पध्दतीने मंडळ कार्यालयात स्विकारण्यात येतील.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर